रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १८१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कोकण शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचे बिगूल वाजले



**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोकण शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचे बिगूल वाजले आहे. शनिवारपासून मतदार नाव नोंदणीस सुरुवात होणार असून ही नोंदणी येत्या सात नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. दावे आणि हरकती, सूचना ही प्रक्रिया पार पडल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी प्रारूप आणि त्यानंतर ३० डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात येणार आहे. गेल्या सहा वर्षांच्या कालावधीत तीन वर्षे अध्यापन केलेले शिक्षक मतदान करण्यासाठी पात्र असणार आहेत. निवडणुकीच्या तयारीची माहिती कोकण विभाग, सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त मनोज रानडे यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली.

कोकण शिक्षक मतदार संघातील विधान परिषद सदस्याचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२३ मध्ये संपुष्टात येते आहे. त्यामुळे या मतदार संघाची निवडणूक घेण्याकरिता निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. या तयारीची माहिती कोकण विभाग, सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त मनोज रानडे यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली. मतदार नोंदणीची जाहीर सूचना उद्या काढण्यात येणार आहे. त्यानंतर उद्याप-ासूनच मतदार नोंदणी सुरू करण्यात येणार आहे. गेल्या वेळी झालेल्या निवडणुकीसाठी ३६ हजार मतदारांची नोंद झाली होती. यावेळी ती ४० हजारपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. जास्तीत जास्त शिक्षकांनी आपल्या नावाची नोंदणी मतदार यादीत करावी यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. शाळाशाळांमध्ये जाऊन शासनाच्या वतीने जनजागृती केली जात आहे, असे मनोज रानडे यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी माहिती उपसंचालक गणेश मुळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



पूर्वी शिक्षक मतदार संघाची मतदार यादी अपडेट केली जात होती. नवीन मतदारांची नावे वाढवली जात होती. मात्र गेल्या निवडणुकीपासून ही पद्धत बंद करण्यात आली आहे. ही यादी पदवीधर मतदार संघाप्रमाणे नव्याने तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वांनाच नोंदणी करावी लागणार आहे. कोकण विभागात वास्तव्यास असलेल्या माध्यमिक शिक्षकांना आपले नाव मतदार यादीत नोंदविता येणार आहे. राजकीय पक्षांचे अर्जांचे गठ्ठे स्वीकारणार नाही.

मतदार नोंदणीसाठी शिक्षकांनी आपले अर्ज भरून हातोहात नोंदणी कार्यालयापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. शिक्षण संस्थांनी पाठवलेले अर्जांचे गठ्ठे स्वीकारण्यात येणार आहेत. मात्र तसेच गठ्ठे राजकीय पक्षांचे स्वीकारले जाणार नाहीत. वास्तव्याचा पुरावा म्हणून कोणताही एक पुरावा चालणार नाही. नोकरी कोणत्याही विभागात असली तरी वास्तव्याचा पुरावा कोकण विभागात असलेल्या शिक्षकांना मतदान करता येणार आहे.

# माहिती व जनसंपर्क महासंचालकपदी जयश्री भोज

**दै.रायगड नगरी । मुंबई**



शासनाचे काम जनतेपर्यंत आणि जनतेच्या भावना शासनापर्यंत पोहचवणारा दुवा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे काम महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. शासन योजनांच्या अधिक व्यापक आणि गतिमान प्रसिद्धीचे काम संघटितपणे करण्याचे आवाहन नवनियुक्त माहिती व जनसंपर्क महासंचालक जयश्री भोज यांनी आज येथे केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक पदाचा कार्यभार श्रीमती जयश्री भोज यांनी दीपक कपूर यांच्याकडून आज स्वीकारला. यावेळी श्रीमती भोज यांचे श्री. कपूर यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच श्री.कपूर यांना पुष्पगुच्छ देवून निरोप देण्यात आला. यावेळी प्रभारी संचालक (वृत्त-जनसंपर्क) दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी, उपसंचालक (प्रदर्शने) श्रीमती सीमा रनाळकर, उपसंचालक (प्रकाशने) अनिल आलुरकर यांचेसह विभागातील वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना श्रीमती भोज यांनी येत्या काळात सांघिक प्रयत्न आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून शासन योजनांची व्यापक प्रसिद्धी करण्याच्या भावना व्यक्त केल्या. श्री.कपूर यांनी या विभागात महासंचालक आणि सचिव म्हणून काम करताना अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम, कल्पना राबवता आल्याचा आनंद व्यक्त करून सातत्याने सर्तक राहून काम करणाऱ्या या विभागाचे काम निश्चितच अतिशय महत्वपूर्ण आणि सृजनशील असल्याच्या भावना व्यक्त केल्या. श्री.कपूर यांची जलसंपदा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदावर नियुक्ती झाली आहे.

# १ ऑक्टोबरपासून सीएनजी-पीएनजीच्या दरात वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आधीच महागाईने बेजार झालेल्या सामान्य नागरिकांना आणखी एक झटका बसणार आहे. केंद्र सरकारनं नैसर्गिक गॅसची किंमत तब्बल ४० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. नैसर्गिक गॅसची किमत ६.१ डॉलर प्रति एमएमबीटीयू वरुन ८.५७ डॉलर प्रति एमएमबीटीयू करण्यात आली आहे. नवीन दर एक ऑक्टोबर म्हणजे उद्यापासून लागू होणार आहे

नैसर्गिक गॅसची किमत ६.१ डॉलर प्रति एमएमबीटीयू वरुन ८.५७ डॉलर प्रति एमएमबीटीयू करण्यात आली आहे. एप्रिल २०२२ मध्ये नैसर्गिक गॅसची किंमत वाढून ६.१० डॉलर प्रति एमएमबीटीयू करण्यात आली होती. आता एक ऑक्टोबर २०२२ पासून यामध्ये वाढ करण्यात आली असून ८.५७ डॉलर प्रति एमएमबीटीयू करण्यात आली आहे. म्हणजेच यामध्ये ४० टक्के वाढ करण्यात आली आहे. एप्रिलमध्ये दुप्पट वाढ करण्यात आली होती. घरगुती गॅसच्या दराबरोबर आता वाहतुकीच्या खर्चात देखील वाढ होणार आहे. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस आरबीआयनं रेपो रेटच्या दरात वाढ करत सर्वसामान्यांना झटका दिला आता नैसर्गिक गॅसच्या किंमतीमध्ये वाढ करत डबल झटका दिला आहे.

नैसर्गिक वायूच्या किंमतीत १ डॉलरने वाढ झाल्यानंतर सीएनजीचे सीएनजीच्या दरात साडे चार रुपये प्रतिकिलो इतकी वाढ होते. सीएनजीच्या दरात १२ ते १३ रुपये किलो वाढ होण्याची शक्यता आहे. तर पीएनजीच्या दरात देखील वाढ होण्याची शक्यता आहे.

# जेएनपीए बंदरास मिळाला इकॉनॉमिक टाइम्स इन्फ्रा फोकस पुरस्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

**जेएनपीए बंदरास इकॉनॉमिक टाइम्स इन्फ्रा फोकस पुरस्काराने २०२२ मध्ये सार्वजनिक-खाजगी गुंतवणुकीस अर्थात पीपीपीला (बंदरे) प्रोत्साहन देणारी सर्वाधिक प्रशा सनीय केंद्रीय संस्था म्हणून गौरवण्यात आले.**



मागील २५ वर्षांत देशात बंदर क्षेत्रातील सार्वजनिक-खाजगी गुंतवणुकीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. जवाहरलाल नेहरू पोर्टने जुलै १९९७ मध्ये न्हावा शेवा इंटरनॅशनल कंटेनर टर्मिनल (एनएसआयसीटी) या खाजगी टर्मिनल सोबत ऐतिहासिक करार केला होता.एनएस आयसीटी हे देशातील प्रमुख बंदरांमध्ये पीपीपी तत्त्वावर विकसित केलेले पहिले पोर्ट टर्मिनल बनलेअसून अशा प्रकारचा करार करणारे जेएनपीए हे देशातील पहिले बंदर ठरले आहे.

इकॉनॉमिक टाईम्स इन्फ्रास्ट्रक्चर अवॉर्ड्सचे उद्दिष्ट देशातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणा-या संस्थाना शोधून त्यांना पुरस्कृत करने आहे, ज्या अन्य संस्थासाठी प्रेरणादायी आहेत. विकासक, केंद्र आणि राज्य संस्था आणि वित्त पुरवठा करणा-या जागतिक दर्जाच्या संस्था ज्या उत्कृष्ट व्यावसायिक कौशल्य, सर्वोत्तम पद्धती, अनुकरणीय दृष्टी आणि पीपीपी प्रकल्पांच्या संकल्पना, विकास आणि अंमलबजावणीमध्ये एकूणच उत्कृष्टतेचे प्रदर्शन करून इतरांसाठी अनुकरणीय बनतात.अशा संस्थांना एकत्रित करण्यावर त्यांचा भर आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्याला आकार देणाऱ्या संस्थांच्या प्रयत्नांनाही या पुरस्काराने मान्यता मिळते.याशिवाय जेएनपीएला अलीकडेच मेरीटाइम आणि लॉजिस्टिक अवॉर्ड्स २०२२ मध्ये वर्षातील सर्वोत्कृष्ट कंटेनर बंदर पुरस्काराने सुद्धा सन्मानित करण्यात आले आहे.

जेएनपीए बंदराच्या कार्यक्षमतेमध्ये आणि उत्पादकतेमध्ये सुध्दा वाढ झाली. जेएनपीए आणि जे एम बक्शी एण्ड लॉजिस्टिक्स लि. सीएमए टर्मिनल्स यांच्यात २९ जुलै २०२२ रोजी सवलत करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती, ज्यामुळे जेएनपीए हे भारताचे पहिले लॅंडलॉर्ड बंदर बनले आहे. जेएनपीएच्या वतीने उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी पुरस्कार हा पुरस्कार स्विकारला असून पुरस्कार वितरण कार्यक्रमात कृतज्ञता व्यक्त करतांना उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी जेएनपीएचे सर्व कर्मचारी आणि भागधारकांचे आभार मानले असून, हा पुरस्कार आमच्या प्रयत्नांना आणि आमच्या भागधारकांना व ग्राहकांसाठी आम्ही देत असलेल्या कार्यक्षम सेवेची पोचपावती आहे.

## मुंबई -पुणे राष्ट्रीय महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच

# जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर एनएमएमटी बसला अपघात

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुना मुंबई -पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रं.०४ वर अपघाताची मालिका सुरूच असून आज सकाळी ९.२० वाजता विणेगांव हद्दीत बापदेव मंदिरासमोरील रस्त्यावर एन.एम.एम.टी प्रवासी बसचा अपघात झाला आहे.



खोपोली हुन सी.बी.डी बेलापूर मुंबई येथे प्रवासी घेऊन जात असतांना एन.एम.एम.टी बस क्रं.एमएच.४६.बी ८१७० ही बस समोरील ४०७ या टेम्पो ने अचानक ब्रेक लावल्याने, बस ही भरधाव वेगात असल्यामुळे बस चालक कमलेश मिश्रा या चालकाने बसला ब्रेक मारल्यानंतर ही बस थांबली नसल्यामुळे समोरील टेम्पोला धडक बसणार ही बाब लक्षात येताच बस चालकाने प्रसंग अवधान राखत रस्त्यामधोमध असणाऱ्या सिमेंट कॉंक्रीटच्या कठड्यावर बस चढवून बस थांबविण्यात आली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही. या बस मध्ये ७० ते ८० प्रवासी प्रवास करत होते. या रस्त्यावर मोठ मोठे कंटेनर रस्त्यावर उभे असल्यामुळे टेम्पो चालक बसच्या पुढे भरधाव वेगाने जात होता समोरील रस्त्याच्या कडेला थांबलेले कंटेनरने अचानक टन घेतल्यामुळे टेम्पो चालकाने अचानक ब्रेक घेतला जर मी बस रस्तेच्या कठड्यावर चढवली नसती तर भीषण अपघात झाला असता अशी माहिती बस चालक कमलेश मिश्रा व कंडक्टर स्वप्निल साळुंखे यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले.

या अपघातामुळे राष्ट्रीय महामार्गावर काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती. या अपघाताची माहिती मिळताच खालापूर पोलीस ठाण्याची टीम घटनास्थळी हजर होवून रस्त्यावरील अडकलेले कंटेनर क्रेनच्या सहाय्याने बाजूला हटवून येथे झालेली वाहतूक कोंडी सुरळीत करण्यात आली.

## नवरात्रोत्सवात ध्वनीची विहित मर्यादा राखून

# ध्वनीक्षेपण व ध्वनीवर्धक यंत्रणा वापरण्यास जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा कार्यक्षेत्रात सन २०२२ या वर्षाच्या कालावधीत ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २०१७ च्या नियम ५ उपनियम ३ नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज इतर ठिकाणी ध्वनीची विहीत मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यत जिल्ह्यात १५ दिवस निश्चित करण्यात आलेले आहेत.

अधिसूचनेद्वारे नवरात्र उत्सवाच्या कालावधीत पंचमी, अष्टमी व नवमी असे एकूण तीन दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीची विहीत मर्यादा राखून ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करण्यास परव-ानगी देण्यात आली आहे. तसेच दि.१ ऑक्टोबर २०२२ या दिवशी नवरात्रोत्सवासाठी सकाळी ६

# कर्जत नगर परिषदेचा स्वच्छ सर्वेक्षणात पुन्हा ठसा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

स्वच्छ सर्वेक्षण २०२१-२२ मध्ये ही कर्जत नगर परिषदेने चमकदार कामगिरी केली असून स्वच्छता अभियानाच्या विजेत्यांमध्ये समावेश झाला आहे,१ऑक्टोबरला राष्ट्रपतींच्या हस्ते होणाऱ्या बक्षीस वितरण समारंभाचे आमंत्रण नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे, इंडियन स्वच्छता अभियानाची केंद्र शासनाने दखल घेतली असून त्या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचे आमंत्रण कर्जत नगर परिषदेस प्राप्त झाले आहे, या स्पर्धेमध्ये बक्षीस निश्चित झाले असून कितवा क्रमांक मिळणार याविषयी कर्जतवासीयांना उत्सुकता निर्माण झाली आहे.

स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये कर्जत नगर परिषदेचा क्रमांक येणार असल्याने स्पष्ट झाले आहे, १ ऑक्टोबर ला नवी दिल्ली येथे राष्ट्रपतींच्या हस्ते होणाऱ्या कार्यक्रमांचे आमंत्रण कर्जत नगरपरिषदेला आहे.त्यामुळे आता नंबर कितवा याची उत्सुकता लागून राहिली आहे. स्वच्छतेचा अमृत महोत्सव अंतर्गत शासनाने इंडियन स्वच्छता लीगचे आयोजन केले होते.

कर्जत नगर परिषदेने स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये मागील वर्षभरात परिश्रम घेतले होते लोकसहभाग वाढवून नाविन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणल्या होत्या, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणच्या चौकात भिंती तयार करून त्यांवर चित्र काढून स्वच्छतेची जनजागृती केली, तसेच चौकामध्ये कोपरा गार्डन तयार केली आहेत त्याठिकाणी स्टॅंच्यु उभारले आहेत,या कामगिरीची दखल केंद्र शासनाने घेतली आहे.



# नव्या रचनेची नव्याने घडी

'देर आये मगर दुरुस्त आये' असा हिंदीत वाक्प्रचार आहे. इंग्रजीत 'बेटर लेट दॅन नेव्हर' असे म्हणतात. नव्या संरक्षणदल प्रमुखांच्या नियुक्तीचे स्वागत करताना यापैकी काय वापरावे, असा प्रश्न पडेल. तीनही सैन्यदलांचे एकात्मिक प्रमुख म्हणजे संरक्षण दलप्रमुख किंवा सीडीएस या पदावर ते रिक्त झाल्यानंतर दहा महिन्यांनी लेफ्टनंट जनरल अनिल चौहान यांची नियुक्ती झाली आहे. गेल्या तीन वर्षांपासून चीनने भारतासाठी मोठे आव्हान उभे केले असल्याने चीन व्यूहनीतीत निपुण मानले गेलेले लष्करी अधिकारी सीडीएस पदावर नियुक्त झाले आहेत. जम्मू-काश्मीर तसेच ईशान्य भारत या दोन्ही सीमांवरील दहशतवादाचा सामना करण्याचा अनुभव गोरखा रायफल्समधून आलेले जनरल चौहान यांच्या गाठीशी आहे. त्यांच्या या सर्व अनुभवांचा लाभ आगामी काळात मिळेल. मात्र, सीडीएसच्या नियुक्तीतला विलंब क्षम्य नाही. दहा महिन्यांचा विलंब पाहता सरकारला ही व्यवस्था मोडीत तर काढायची नाहीना, अशा शंका व्यक्त होऊ लागल्या. नोकरशाहीतील बडे सनदी अधिकारी आणि संरक्षण दलांचे अधिकारी यांच्यातील शीतयुद्धाचीही या शंकांना किनार असते. जूनमध्ये सरकारने सीडीएस नियुक्तीचे निकष बदलले व त्यानुसार ६२ वर्षांपर्यंतचे निवृत्त अधिकारीही पदास पात्र ठरले. साहजिकच, ६२ व्या वर्षी निवृत्त झालेले लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्यासह अन्य काही माजी प्रमुखांचा विचार आता होणार नाही, हे स्पष्ट झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट २०१९ रोजी लाल किल्ल्यावरून सीडीएस व्यवस्था अस्तित्वात येणार असल्याची घोषणा केली होती. देशाच्या सुरक्षेशी निगडीत इतकी महत्त्वाकांक्षी योजना निरंतर सुरू राहू शकत नाही, हे निश्चितच भूषणावह नाही. सैन्यदलांच्या सेवेत निवृत्तीनंतरचा उत्तराधिकारी आधीच ठरविला जातो. देशाचे पहिले सीडीएस जनरल बिपीन रावत यांचे आठ डिसेंबर २०२१ रोजी हेलिकॉप्टर अपघातात दुर्दैवी निधन झाले. त्यामुळे, हे पद अचानक व अनपेक्षित रिक्त झाले, हे मान्य. परंतु त्यानंतर झालेल्या विलंबाचा थेट परिणाम म्हणजे जनरल रावत यांनी सुरू केलेल्या कामाला दहा महिने खीळ बसली. कारगिल युद्धानंतर नेमलेल्या समितीने सीडीएस आवश्यक असल्याची शिफारस केली होती. या सीडीएस नियुक्तीचा प्रमुख उद्देश तीनही सैन्यदलांमध्ये अधिकाधिक समन्वय व संयुक्तपणे कामगिरी बजावण्याची संस्कृती रुजविणे तसेच युद्धाच्या धोक्यांना अनुसरून 'थिएटर कमांड' निर्माण करणे हा होता. आजवर पाकिस्तान व चीनबरोबर झालेल्या युद्धांमध्ये दरवेळी तिन्ही दलांनी एकत्रित काम करणे कसे उपयुक्त असते, हे वारंवार सिद्ध झाले होते. कारगिल युद्धात लष्कराच्या निकराच्या झुंजीबरोबरच हवाई दलाच्या विमानांनी निर्णायक भूमिका बजावली व त्याचवेळी भारतीय नौदलानेही समुद्रात नाकेबंदी केली होती. आता चीनच्या विस्तारवादामुळे आव्हानांचा पल्ला कमालीचा वाढला आहे. या पार्श्वभूमीवर तीन सैन्यदलांच्या १७ कमांडऐवजी संरक्षण आव्हानांनुसार पाच कमांडमध्ये फौजफाटा तैनात होणार आहे. ही प्रक्रिया किचकट व आव्हानात्मक आहे. सन २०२२ पर्यंत या पाच कमांडची रचना अस्तित्वात येईल, असे जनरल रावत यांनी सूचित केले होते. मात्र, अद्याप ते झालेले नाही. या कमांडच्या रचनेवरून प्रत्येक दलामध्ये काही किंतुपरंतु आहेत आणि हवाई दलाला नव्या रचनेत गौण स्थान मिळेल का, अशीही काहींना भीती आहे. आगामी काळात युद्धे ही केवळ जमिनीवर नव्हे, तर हवाई मारा, आरमारी नाकेबंदी, सायबर हल्ले, ड्रोन्स व उपग्रहांचा अतोनात वापर या सर्व बाजूंनी लढली जातील. एकत्रित कमांड करताना या व्यूहरचनांचा विचार करावा लागेल. मात्र, सर्वाधिक विचार हा 'मेन बिहाइंड द मशीन' यांचा असेल. नव्या रचनेत सेवाज्येष्ठता डावलली जाईल का, कुणी कुणाकडून आदेश घ्यायचे, या किचकट प्रश्नांचा प्रथम सामना करावा लागेल. तीनही सैन्यशाखांच्या प्रमुखांचे अधिकार कसे राहतील, असाही प्रश्न असेल. या रचनेची तयारी म्हणून सर्वांत पहिल्या पायरीवरच्या हुद्द्यापासूनच परस्पर सेवांमधील आदानप्रदान वाढायला हवे. सध्या काही युद्धनौका या लष्करी युनिटला संलग्न केल्या जातात. त्याचबरोबर पश्चिम लहर, ट्रॉपेक्ससारख्या काही युद्धसराव कवायतींमध्ये तीनही दलांचा समावेश असतो. परंतु याचे प्रमाण वाढायला हवे. थिएटर कमांड व सीडीएसमुळे युद्धसामग्रीवरील वायफळ व दुहेरी खर्चाला आळा बसावा आणि आत्मनिर्भरता अधिक रुजावी, हाही एक उद्देश आहे. नव्या अग्निपथ योजनेची घडीही नव्या सीडीएसना बसवावी लागेल. कोणत्याही सेवेचे महत्त्व न डावलता ते समन्वयाचा नवा अध्याय कसा व किती जलद लिहितात, त्यावर त्यांच्या प्रभाव अवलंबून आहे. अन्यथा, निवृत्तीनंतरचे एक प्रलोभन किंवा सरकारी सूचनांचे पालनकर्ते म्हणून या पदाचा वापर होण्याचा धोका आहे. तसे होऊ नये.

# कबुली जबाब संचिका तात्काळ उपलब्धतेसाठी उपाययोजना करा : विजय तळेकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महसुली गावांमधील फेरफार नोंदींच्या बाबत कबुली जबाब संचिका तहसिलदार कार्यालयाच्या अभिलेख कक्षात जतन ठेवल्या जातात. पनवेल तालुक्यातील महसुली गावांमधील कबुली संचिकेच्या सही-शिक्क्याच्या नकलेची मागणी केली असता तहसील कार्यालयाकडून अनेक दिवस फेऱ्या मारुनही बहुतांश वेळा कबुली जबाब संचिका आढळून येत नाही असे उत्तर मिळते.



सदर समस्या तडीस नेण्यासाठी शिवसेना लिगल सेल, पनवेल यांच्यातर्फे तहसीलदार विजय तळेकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी विजय तळेकर यांनी तात्काळ सदर विनंती मान्य करत अभिलेख कक्षाला कबुली जबाब संचिका तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी योग्य त्या उपाय योजना करण्याचे तोंडी आदेश दिले. तहसीलदारांच्या या कार्यतत्परतेबाबत शिवसेना लिगल सेल पनवेल यांच्याकडून तहसीलदारांचे आभार मानण्यात आले.

यावेळी शिवसेना लिगल सेलचे अॅड. सचिन म्हात्रे, अॅड. महेश देशमुख, अॅड. संगिता रोकडे, अॅड. सुयश कामेरकर, अॅड. महेश केणी, अॅड. सुशांत घरत, अॅड. विनोद पटेल, अॅड. रोहन मोरे आणि अॅड. अमर पटवर्धन उपस्थित होते.

# पनवेल शाळेतील मुलांसाठी इनर व्हीलतर्फे नवरात्रोत्सव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्था, मार्केट यार्ड, पनवेल येथे आज इनर व्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन च्या वतीने नवरात्रोत्सव निमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दुपारचे सुग्रास भोजन आणि प्रसाद म्हणून फळे देण्यात आली. यासाठी येणारा प्रमुख खर्च प्रेसिडेंट कल्पना नागावकर आणि क्लब संस्थापिका वृषाली सावळेकर यांनी दिला. पौगंडावस्थें मधील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी शारीरिक स्वच्छता व काळजी कशी घ्यावी याबद्दल डॉ. मनीषा कांबळे आणि डॉ. राजश्री बागडे यांनी उत्तम मार्गदर्शन केले. यानंतर नवरात्री उत्सव चालू असल्यामुळे विद्यार्थिनींसाठी भोंडला गाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेचे प्राचार्य श्री प्रक्षाळे सर, प्रतिभा लादे आणी सर्व शिक्षक वर्ग यांनी खुप मेहनत घेतली. क्लब अध्यक्ष कल्पना नागावकर , सचिव सई पालवणकर, क्लब संस्थापिका वृषाली सावळेकर, माजी अध्यक्ष शुभांगी वालेकर , डॉ.मनीषा कांबळे, डॉ. राजश्री बागडे, डॉ. साधना गांधी, रेखाताई कांडपिळे, ज्योती गुंदेचा, वैशाली ठाकरे, मोहिका भुजबळ या क्लब मेंबर्सच्या उपस्थितीत हा कार्यक्रम थाटात संपन्न झाला.

# शासनाच्या रोजगाराभिमुख योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास स्थलांतर रोखण्यात १०० टक्के यश येईल : संदीप चव्हाण

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

शासनाच्या रोजगाराभिमुख योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास स्थलांतर रोखण्यात १०० टक्के यश येईल असा विश्वास सहाय्यक कामगार आयुक्त संदीप चव्हाण यांनी व्यक्त केला. स्थलांतर रोखण्यासाठी सुधागड प्रशासनाने कंबर कसली असून यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासंदर्भात सहाय्यक कामगार आयुक्तांच्या प्रमुख उपस्थितीत पाली तहसिल कार्यालयात महत्वपूर्ण बैठक पार पडली.



आदिवासी स्थलांतर झालेल्या कुटुंबीयांची यादी, तसेच यापुढे स्थलांतर होताना रात्री अपरात्री होणारे स्थलांतर रोखणे, तसेच स्थलांतरीत होत असलेल्या कुटुंबातील शाळेतील लहान मुले यांना घेऊन जाताना त्यांच्या शिक्षणाची हमी , तसेच रोजगाराची हमी यासंदर्भात ग्रामपंचायतीला हमीपत्र देणे , समाजप्रबोधन, जनजागृती यासंदर्भातील महत्वपुर्ण चर्चा व सूचना उपस्थित पोलिस पाटिल यांना या बैठकीत देण्यात आल्या. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त संदीप चव्हाण व गव्हरमेन्ट लेबर ऑफिसर स्नेहल माटे यांनी स्थलांतर रोखण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा अन्न योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक सहाय्य योजना अशा विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. व यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊन स्थलांतर रोखणे शक्य असल्याची ग्वाही दिली. आदिवासी बांधवांचे स्थलांतर होऊच नये यासाठी अधिक दक्ष राहुयात, आदिवासी कुटुंब स्थलांतर झाल्यानंतर तेथे महिला व लहान मुलांचे शोषण होते, महिलांवर अत्याचाराच्या घटना होतात, सर्पदंशाने मृत्यू होण्याचे प्रमाण देखील अधिक असते, गोरगरीब आदिवासी बांधव हे पोटापाण्यासाठी जातात खरे पण त्यांच्या सुरक्षेची कोणतीही हमी दिसून येत नाही, त्यामुळे असे स्थलांतर रोखण्यासाठी पोलीस प्रशासन देखील आवश्यक ती सहकार्याची भूमिका पार पाडेल अशी ग्वाही पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांनी दिली. यावेळी तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी सप्तसूत्री कार्यक्रम राबविला जात आहे. तसेच त्यांचे विविध मार्गांनी प्रबोधन होत आहे. कातकरी उत्थान अभियान अंतर्गत विविध योजना व दाखले त्यांच्या पर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. स्थलांतर रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या असल्याचे सांगितले.

> जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या सप्तसूत्रीची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जातेय. विविध योजनांची माहिती आदिवासींपर्यंत पोहचवत आहोत. आदिवासींचे बालविवाह थांबणे आवश्यक आहे. स्थलांतर रोखण्यासाठी पथनाट्याद्वारे प्रबोधन व जनजागृती केली जात आहे. आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी पथनाट्याद्वारे प्रबोधन व जनजागृती करण्याचा हा पथदर्शी प्रकल्प स्वयंस्फूर्तीने राबविला जातोय. शिवाय स्थलांतर रोखण्यासाठी संबंधित ठेकेदारांकडून हमीपत्र भरून घेतले जात आहेत. काही समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून रोजगार, शिक्षण व कौशल्य निर्मितीसाठी प्रयत्न होत आहेत.
>
> **दिलीप रायण्णावार,**
> **तहसीलदार, पाली-सुधागड**

# ऐनवहाळ येथील सामाजिक सभागृहास १० लाखाच्या निधीचे पत्र

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यतील ऐनवहाळ येथील सामजिक सभागृहास सुमारे १० लाखाचे निधीचे पत्र माजी पालकमंत्री आमदार अदिती तटकरे यांच्या हस्ते ग्रामस्थाना सुपूर्द करण्यात आले आहे.

ऐनवहाल हे एक अध्यात्मिक गाव आहे. या ठिकानी ग्रामस्था तर्फे विविध धार्मिक कार्यक्रम होतात. गावमध्ये विविध विकास कामे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून झाली आहेत. तरी गावमधे भव्यदिव्य सामाजिक सभागृह असावे. अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार अनिकेत तटकरे यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत सुमारे १० लाख रुपये मंजुर केले. व निधीचे पत्र माजी पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्याहस्ते ग्रामस्थांना सुपूर्द करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ रामदास खामकर, राजू खामकर, दिपक धामणसे, ग्रामस्थ मुंबई कर मंडळ उपस्थित होते.

कोलाड खांब विभागात राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून पाणी, वीज, रस्ते, व गावच्या मंदीरांचे शुशोभीकरण होत आहेत.विकासाच्या बाबतीत गावे सुजलाम दिसत आहेत. ग्रामीन जनतेची कामे करणारे लोकप्रतिनिधी हे तटकरे परिवाराच्या माध्यमातून मिळाले असल्याने या विभागात राष्ट्रवादीची तटबंदी मजबूत आहे निधी आणणे, विकास करने, जनतेची कामे करणे, सतत तळागाळातील लोकांच्या संपर्कात रहाणे. प्रशांसनातील कौशल्य ही कामे खासदार सुनिल तटकरे, आमदार आदितीताई व आ.अनिकेत तटकरे यांनीच करावी. आज तरुणाईमध्ये आ. अदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे आशेचे किरण ठरलेत अशी प्रतिक्रीया युवा कार्यकर्ते दिपक धामणसे यांनी यावेळी दिली आहे.



# बोर्ली मंडळ अधिकारी लक्ष्मण शेळके सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील मंडळ अधिकारी लक्ष्मण शेळके आपली ३२ वर्षांची सेवा उत्तम प्रकारे करुन सेवानिवृत्त झाले.

उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, तहसीलदार रोहन शिंदे, निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, कार्यालयीन कर्मचारी वृंद यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात लक्ष्मण शेळके व त्यांच्या सौभाग्यवती यांना मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

आज नियत वयोमानानुसार बोर्ली मंडळ अधिकारी लक्ष्मण शेळके उत्तम प्रकारे सेवा करुन सेवानिवृत्त होत आहे. शेळके यांचा सेवा कालावधी ज्या ज्या कर्मचारी यांनी जवळून पाहिला आहे. त्यातील मी एक असून सन.२००७ मध्ये यांचा आणि माझा जवळून संपर्क झाला. चांगले हस्ताक्षर, स्पष्टोक्ता, नेहमीच संघर्ष करून पुढे आलेला कर्मचारी, वर्ग ४ पासून ते वर्ग २ ची अशास्वीत प्रगती योजनेतील पदोन्नती पर्यन्त प्रत्येक टप्प्यावर संघर्ष करून हक्क संपादन केलेला एक योद्धा कर्मचारी अशी त्यांची ओळख असावी. संघर्षमय जीवनातून कधी हार न मानता, तसेच मनात विरोधाची अढी न ठेवता जिव्हाळ्याचे संबंध जोपासणारा माणूस, त्यांच्या सेवा निवृत्तीने प्रशासकिय कामात नकळत का होईना निवडणूक साहित्य म्हणा कि शासकीय प्रेस मधील कोणतेही काम करताना उणीव भासत राहील. अशी प्रतिक्रिया नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी व्यक्त केली.

# कवितांमध्ये रंगले विद्यार्थी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील आवरे येथील रामचंद्र म्हात्रे ज्युनियर कॉलेजमध्ये रायगडभूषण जेष्ठ साहित्यिक प्रा.एल.बी.पाटील यांच्या अध्यक्षते खाली कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) उरणच्या कवींचे रंगतदार कविसंमेलन संपन्न झाले. प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी उत्कृष्ट असे प्रास्ताविक केले.


आपल्या रंगतदार वाणीने सूत्रसंचालन करून प्रा.शरद केणी यांनी कविसंमेलन अतिशय छान खुलविले. मच्छिंद्र म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे यांच्या आगरी बोलीतील विनोदी कवितांनी विद्यार्थ्यांना भरपूर हासविले. भगवान.पो.म्हात्रे, संजय होळकर, अरुण म्हात्रे यांनी गुरूचे संस्कार आणि विकासात्मक ध्यास यावर कवितांचे वाचन केले.

नववीच्या उपासना गावंड विद्यार्थीनीने मुलामुलीच्या वागण्यावर विनोदी शैलीत गाऊन कविता सादर केली. उरणातील सुमधुर आवाज असलेले सुजीत डाकि यांनी प्रेम या विषयावर कविता गाऊन तरुणाईला आनंदी केले. इवान आणि मामा लय मोठा या विनोदी दोन कविता सादर करून भरपूर दाद मिळविली. अशा प्रकारे रामचंद्र म्हात्रे जुनिअर कॉलेज मध्ये कवी संमेलन मोठ्या उत्साहात उत्तम प्रतिसादात संपन्न झाले.

# नवरात्रोत्सवात सुधागड किल्ल्यावरील श्री भोराई देवीचा उत्सव जल्लोषात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

छत्रपती शिवरायांचे पदस्पर्श लाभलेल्या प्रसिद्ध ऐतिहासिक सुधागड किल्ल्यावर विराजमान असलेली श्री भोराई देवी ही सुधागड तालुक्यासह महाराष्ट्रातील अनेकांचे श्रद्धास्थान आहे. अश्विन नवरात्रात देवीच्या दर्शनासाठी किल्ल्यावर रोज हजारो भाविक दाखल होत आहेत. फार वर्षांपूर्वी बंद झालेला नवरात्रोत्सव पुन्हा सुरू करण्याचे यंदाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाय मंदिर व मंदिर परिसरात रंगरंगोटी, रोषणाई, रांगोळी, हार व फुलांची सजावट करण्यात आली आहे.



श्रावणात देखील देवीच्या दर्शनाला काही प्रमाणात भाविक येतात. नवरात्रात येथे भाविकांची उदंड गर्दी पहायला मिळते. त्यांच्या उत्साहाला उधाण आले आहे. त्यामुळे येथील परिसर भक्तिमय व उत्साही झाला आहे.

आजही श्री भोराई देवस्थान मंडळाचे विश्वस्त गडावर नवरात्र उत्सव पूर्वापार पद्धतीने साजरा करण्याचा प्रयत्न करत आहेत. नवरात्रोत्सवात मंदिरात सकाळी पूजा, अभिषेक, सायंकाळी आरती, रात्री किर्तन असा कार्यक्रम असतो. अष्टमीच्या दिवशी गडकर्यांना मानाप्रमाणे नारळ व मानाचे विडे दिले जातात. शिलंगणाचे दिवशी पालखी निघते. नवरात्रात हजारो भाविकांना प्रसादाचा लाभ दिला जातो. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून दोन वर्षांपासून प्रसाद (जेवण) देणे बंद होते ते आता पुन्हा चालू करण्यात आले आहे. यावेळी सुजित बारसकर व उमेश खंडागळे आदींसह विश्वस्त गडावर उपस्थित आहेत.

श्री. भोराई नवरात्र उत्सव २०२२ हे वर्ष ५० वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. किल्ले सुधागडावर फार पूर्वी पासून भोराई मातेचा नवरात्र उत्सव साजरा होत असे. परत भोर संस्थान नंतर काही वर्षे नवरात्र उत्सव बंद झाला होता. परंतु १९७२ सालापासून स्वर्गीय नामदेवशेठ खैरे यांच्या पुढाकाराने नवरात्रोत्सवाला परत सुरुवात झाली आहे. सध्या त्यांचे पुत्र व माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश खैरे व त्यांचे सहकारी नवरात्रोत्सवाचे नियोजन व आयोजन करतात.

सुधागड किल्ल्यावर प्राचीन काळातील श्री भोराई देवीचे मंदिर आहे. या देवीची स्थापना भृगु ऋषींनी केलेली आहे. म्हणून या देवीला 'भृगू अंबा, भोरांबा, भोराई' अशीही नावे आहेत. देवीची मूर्ती ३ फुट उंचीची आहे. मूळ चंडीकेचे स्वरुप असणारी श्री भोराई चतुर्भुज असून हातात त्रिशूळ, खड्ग-खेटक आणि दोन हातात आसूड आहे. श्री भोराईदेवीच्या पुरातन मंदिराची भोरच्या पंतसचिवांनी पुनर्बांधणी केली व याच देवीला त्यांनी आपली कुलदेवता/कुलस्वामिनी म्हणून मानले.

पंतसचिव चिमणाजी रघुनाथ उर्फ नानासाहेबांनी पुत्रप्राप्ती झाल्यानंतर येथे १० दिवसांच्या आश्विन नवरात्र उत्सवास सुरुवात झाली. त्याकाळात उत्सव साजरा करण्याची जबाबदारी तालुक्याचे मामलेदार यांच्यावर होती. धार्मिक, निसर्ग आणि ऐतिहासिक पर्यटनाचा आंनद देवीच्या दर्शनासाठी किल्यावर येणारे भाविक घेतात. आजुबाजूचा गर्द झाडीने नटलेला मनोहारी परिसर, वाहते धबधबे, नद्या, डोगररांगा, थंड हवा यांचाही आनंद लुटत असतात. शिवाय किल्ल्यावरील विविध ऐतिहासिक वस्तूंना भेट देतात. त्यामुळे त्यांना तिहेरी आंनद मिळतो.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# ध्वनीक्षेपण व ध्वनीवर्धक यंत्रणा वापरण्यास जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी

वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादीच्या वापराबाबत निर्देश दिलेले आहेत.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करण्यास देण्यात आलेल्या सूटमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी त्यांना प्राप्त अधिकारातून पूर्वीच्या अधिसूचनेत अंशत: बदल करून नवरात्री उत्सव ३ दिवस (पंचमी, अष्टमी व नवमी) ऐवजी नवरात्री उत्सव (दि.१ ऑक्टोबर २०२२, अष्टमी व नवमी) या दिवशी ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २०१७ च्या नियम ५, उपनियम ३ नुसार श्रोतृगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृह आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करण्यास परवानगी दिली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## १ ऑक्टोबर.. राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिनानिमित्त..!

# रक्तदान अमृत महोत्सवानिमित्त.... माझे स्वैच्छिक रक्तदान..!

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत दि.१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस संपूर्ण देशात साजरा करण्यात येणार आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्रात दि.१७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा अभियानांतर्गत माता सुरक्षित तर घर सुरक्षित आरोग्य अभियानाबरोबरच रक्तदान अमृत महोत्सव चेही आयोजन करून ठिकठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

याकरिता Donating blood is an act of solidarity. Join the effort and save lives अथवा रक्तदान हे एकजुटीच कार्य आहे, या प्रयत्नात सामील व्हा आणि जीव वाचवा हे शासनाचे घोषवाक्य आहे.

युवा शक्ती, हीच राष्ट्र शक्ती असल्याने या राष्ट्रीय कार्यक्रमात स्वैच्छिक रक्तदानासाठी युवा वर्गातून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने तसेच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत केंद्रीय आरोग्य मंत्रालयामार्फत रक्तदान अभियान राबविण्यात येत असून केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ.मनसुख मांडविया यांनी दिल्ली येथील सफदरजंग हॉस्पिटल येथे आयोजित रक्तदान शिबिरात स्वतः रक्तदान करून स्वैच्छिक रक्तदान.. अमृत महोत्सव या अभियानाची सुरुवात केली.

यावेळी केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ.मनसुख मांडविया यांनी सर्वांना आवाहन केले की, आपणही या स्वैच्छिक रक्तदान अभियानात भाग घेऊ शकता. मानवतेच्या दृष्टीने या अभियानात आपणही सहभागी होवून या महान कार्याचा भाग होऊ शकता. कारण आपल्या अमूल्य रक्तदानाने कुणाचा तरी जीव आपण वाचवू शकतो.

विज्ञानाने आजपावेतो वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केली असली तरी मानवी रक्ताला अजूनही वैज्ञानिकांना दुसरा पर्याय सापडलेला नाही. माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाला फक्त माणसाचेच रक्त लागते अन् यासाठीच स्वैच्छिक रक्तदान हे महत्त्वाचे ठरते. रक्ताची निर्मिती ही प्रत्येकाच्या मानवी शरिरात होते पण यासाठी



रक्तदान करण्याची मानसिकता असणे गरजेचे आहे.

रक्तदान शिबिर तसेच रक्तकेंद्रात स्वैच्छिक रक्तदान करणे हे महत्त्वाचे ठरते. रक्ताचा एक एक थेंब, मानवी जीवनाचा अंकुर फुलवित असतो.

महाराष्ट्र तसेच देशात जास्तीत जास्त स्वैच्छिक रक्तदान मोहीम ही रक्तदान शिबीर तसेच वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस, पुण्यस्मरण, जयंतीनिमित्त अशा विविध माध्यमातून रक्तसंकलन केले जाते. रक्तदान हेच.. श्रेष्ठ दान...महादान.. ही संकल्पना ठिकठिकाणी वापरली जाते.

रक्त हे मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्याच्या बहुतांश समस्या रक्ताशी निगडीत आहेत. मनुष्याच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण योग्य (१२.५% वर) असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर कोणत्याही कारणाने रक्त संक्रमणाची वेळ आली तर रक्ताच्या उपलब्धतेची गरज भासते आणि तेव्हा रक्तदात्यांची आवश्यकता भासते. तेव्हा प्रथम आपला रक्तगट कोणता आहे हे माहीत असणे आवश्यक आहे.

आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचा एक घटक म्हणून ऋण फेडण्याची संधी रक्तदानाने आपल्याला मिळते. रक्तदाता हा रुग्णाचे प्राण वाचविण्याच्या दृष्टीने रुग्ण व डॉक्टर यांच्यामधील समाजातील एक महत्वाचा दुवा आहे. यासाठी रक्तदाता हा रुग्णासाठी एक देवदूतच ठरतो.

अपघात, शस्त्रक्रिया किंवा प्रसुती वेळी, अति रक्तस्त्राव, थँलेसिमिया, सिकलसेल, कर्करोग, इ. रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी नेहमीच रक्ताची गरज असते. अशावेळी रक्तपेढीत रक्त उपलब्ध नसल्यास रुग्णाच्या नातेवाईकांची धावपळ होते. अशावेळी योग्य रक्ताचा पुरवठा न झाल्यास रुग्णाचा प्राण जाऊ शकतो.

यासाठी रक्तपेढीत रक्तसाठा उपलब्ध असणे गरजेचे आहे. म्हणून जास्तीत जास्त लोकांनी आपल्या जवळच्या शासनमान्य रक्तपेढीत (रक्तकेंद्रात) जावून सामाजिक बांधिलकी म्हणून स्वेच्छेने रक्तदान करणे आवश्यक आहे. रक्तदान हे सुरक्षित व वेदनारहित व आनंददायी असल्याने जास्तीत जास्त लोकांनी सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान करावे.

रक्तदान अमृत महोत्सव अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टल वर स्वैच्छिक रक्तदानासाठी रजिस्टर करून यामध्ये अनेक रक्तदात्यांनी मानवतेसाठी पंतप्रधान महोदयांच्या या मिशनचा भाग बनण्यासाठी सहभागी झाले आहेत. नोंदणीसाठी आपण https://www.eraktkosh.in/ या वेबसाईटवर आजपावतो लाखांच्या वर रक्तदात्यांनी नोंदणी केली व रक्तदान केल्या नंतर त्यांना शासनाकडून ऑनलाईन रक्तदान प्रमाणपत्र देण्यात आले. आपणही रक्तदान अमृत महोत्सव अभियानांतर्गत रक्तदान करुन राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊ शकता. कारण प्रत्येक रक्तदाता हा जीवन रक्षक आहे.

माणुसकीच्या द्दष्टीने, सामाजिक बांधिलकी ठेवून, देशाचा नागरिक म्हणून रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी रक्तदाता या नात्याने स्वैच्छिक रक्तदान करावे.

राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिनानिमित्त...

रक्तदान अमृत महोत्सवानिमित्त..माझे स्वैच्छिक रक्तदान..

एवढेच समाजासाठी आवाहन...!

**लेखन:- हेमकांत सोनार (९५११८८२५७८)**
**जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र, अलिबाग-रायगड.**
**संपादन: मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग**

# आंतरमहाविद्यालयीन पॉवर लिफ्टींग स्पर्धेत अभिनव महाविद्यालयाची चमकदार कामगिरी




**दै.रायगड नगरी । कर्जत**

मुंबई विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन पॉवरलिफ्टींग स्पर्धेत अभिनव महाविद्यालयाला एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक प्राप्त झाले आहे.

मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ आणि के.एम.सी महाविद्यालय खोपोली आयोजित आंतरमहाविद्यालयीन (कोकण विभाग) पॉवरलिफ्टिंग स्पर्धा दि. २४ व २५ सप्टेंबर २०२२ रोजी अभिनव ज्ञानमंदिर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कर्जत रायगड येथे संपन्न झाली. या स्पर्धेचे संचालक डॉ. मोहन आमृळे (शारिरिक शिक्षण व क्रीडा विभाग) मुंबई विद्यापीठ व डॉ. जयवंत माने (संचालक शारिरिक शिक्षण व क्रीडा विभाग) के.एम.सी. कॉलेज, खोपोली यांनी स्पर्धेचे नियोजन केले. तसेच या स्पर्धेत सहभागी स्पर्धक पुरुष वजनगट- ५९, ६६, ७४, ८३, ९३,१०५, १२० + १२० किग्रॅ या वजनगटात एकुण ९० पुरुष स्पर्धक व महिला वजनगट- ४७, ५२, ५७, ६३, ६९, ७६, ८४ + ८४ किग्रॅ एकुण २० महिला स्पर्धक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अभिनव ज्ञानमंदिर संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य, श्रीकांत ओक व अभिनव ज्ञान मंदिर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण घोडविंदे, डॉ.जयवंत माने व तसेच क्रीडा विभाग मुंबई विद्यापीठ येथून आलेले पंच यांच्या हस्ते प्रथमता विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेचे पुजन करुन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. जयवंत माने यांनी केले. त्यांनी स्पर्धेची रूपरेषा प्रास्ताविकेत सांगितली व प्राचार्य डॉ. प्रवीण घोडविंदे यांनी स्पर्धकांना अनमोल असे मार्गदर्शन केले.

प्रथम पुरुष गट व नंतर महिला गट अशा प्रकारे स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अभिनव ज्ञान मंदिर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कर्जत येथील पुरुष गटातून ५९ किग्रॅ या गटातुन केतन विष्णू गायकवाड या स्पर्धकाला रौप्य पदक व प्रमाणपत्र प्रा. गणेश पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे महिला गटातुन वजन गट ५२ किलोग्रॅम प्रेरणा सुभाष रवणे या विद्यार्थिनीस सुवर्णपदक व प्रमाणपत्र अभिनव ज्ञान मंदिर संस्था कर्जत येथील कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख दाभाडे यांच्या हस्ते देण्यात आले. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे अभिनव ज्ञान मंदिर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कर्जतचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. गणेश पाटील व सहकारी प्रा. मंदार लेले, प्रा. प्रशांत दळवी, प्रा. गायत्री शिंदे या सर्वांनी मोलाची भुमिका पार पाडली.

# शनिवारी ‘व्होकल फॉर लोकल’ शीर्षकाखाली वस्तूंचे प्रदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका महिला मोर्चाच्यावतीने स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी ’व्होकल फॉर लोकल’ शीर्षकाखाली शनिवार दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी एक दिवसीय वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीमधील श्री. गणेश मंदिर येथे हे प्रदर्शन दुपारी ०२ ते सायंकाळी ०७ वाजेपर्यंत होणार आहे. या प्रदर्शनाला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनात विविध वस्तूंचे स्टॉल असणार असून यामध्ये गरीब नवाज महिला बचत गट, साई रॅम महिला बचत गट, प्रबुद्ध महिला बचत गट, सहारा महिला बचत गट, उत्पादक गट आजिवली, श्री समर्थ ग्रामसंघ लोणीवली , गावदेवी महिला बचत गट नेरे, श्री शिवकृपा बचत गट भाताणपाडा, नारीशक्ती महिला बचत गट पळस्पे, दुर्गामाता महिला बचत गट, श्री महालक्ष्मी बचत गट, विघ्नहर्ता महिला बचत गट, जयदुर्गा महिला बचत गट, गावदेवी महिला बचत गट, आदर्श महिला बचत गट, श्री कृपा बचत गट अशा विविध बचत गटांचा सहभाग असणार आहे. या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत आणि महिला मोर्चा तालुका पदाधिकारी यांनी केले आहे.

# चिरनेरमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुका विधी सेवा समिती तसेच उरण तालुका वकिल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबीर चिरनेर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. एन. एम. वाली दिवाणी न्यायाधीश क स्तर उरण, श्रीमती पी एन.पठाडे २ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर उरण यांच्या मार्गदर्शना खाली कायदेविषयक मार्गदर्शन जनतेला करण्यात आले.राईटस ऑफ सिनिअर सिटिझन या विषयावर अडव्होकेट केवल गावंड, राईट्स माफ मायनर या विषयावर अडव्होकेट वृषाली पाटील तर राईटस ऑफ फिमेल या विषयावर अडव्होकेट डी व्ही नवाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सर्वांनी कायद्याचे पालन करावे. समाजात शांतता व सुव्यवस्था कशी नांदेल याविषयी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन दिवाणी न्यायाधीश एन. एम. वाली यांनी यावेळी केले. यावेळी चिरनेर ग्रामपंचायतचे सरपंच संतोष चिर्लेकर,ग्रामविकास अधिकारी महेश पवार, चिरनेरचे पोलिस पाटील संजय पाटील, कृष्णा व्यापारी, मनिन चिर्लेकर , श्रीधर मोकल, शकुंतला चिर्लेकर,जागृती स्वयं सहायता स्वयंरोजगार संस्था कार्यकारी तसेच रायगड जिल्हा महिला अध्यक्ष श्रीमती जयवंती गोंधळी, चिरनेर बचत गट सीआरपी शंकुतला चिर्लेकर, चिरनेर गावचे नागरिक, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लग्नाचे आमिष दाखवून प्रेयसीवर बलात्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोपरा येथे राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणीला आधी प्रेमाच्या जाळ्यात ओढुन तिला लग्नाचे आमिष दाखवून २३ वर्षीय प्रियकराने बलात्कार केल्याची घटना खारघर परिसरात घडली आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने खारघर पोलीस ठाण्यात धाव घेतल्यानंतर पोलिसांनी प्रियकरावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. प्रेम संतोष ठाकूर (वय,२३,रा. मुर्बी, खारघर) असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी प्रेम ठाकूर याची पीडित तरुणीशी मैत्री होती. याच मैत्रीचा फायदा उचलत त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यांनतर तिला प्रेमाची भुरळ घालून लग्नाचे आमिष दाखवले. त्यांनतर प्रियकराने पीडितेवर वारंवार अत्याचार केला.

प्रियकर व पीडित तरुणीला लग्नच्या विषयावरून काही महिन्यापूर्वी भांडण झाले होते व आरोपीने मी लग्न करणार नाही तुला जे करायचे आहे ते कर अशी धमकी दिली. काही दिवस निघून गेल्यानंतर पीडितेने झालेला सर्व प्रकार तिच्या आईला सांगितला व पीडितेने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र दोन आठवडे होत आले तरी पोलिसानी अद्याप आरोपिला अटक केलेली नसल्याचे पीड़ित तरुणीने सांगितले.


**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, कामत आळी, सतकार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि.रायगड
दूरध्वनी क्र./फॅक्स क्र.०२१४१-२२२०१३ ईमेल ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयसबाबत)**

**जाहीर नोटीस**

अर्जदार ओम एनक्लेव्ह सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी गैरअर्जदार १) मे.ओम डेव्हलपर्स (बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स) फर्मचे भागीदार १.१) श्री.मयुर एम.शाह, १.२) श्री.सचिन एम.शाह पत्ता शॉप नं.१०, शिवम अपार्टमेंट, लाईन आळी, पनवेल ४१०२०६ २) मे.ओम डेव्हलपर्स (बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स) फर्मचे भागीदार (जागा मालक), २.१) श्री.किर्ती पी.शाह, २.२) श्री.मयुर एम.शाह, २.३) श्री.सचिन एम. शाह पत्ता शॉप नं.१०, शिवम अपार्टमेंट, लाईन आळी, पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे : आसुडगांव, पनवेल शहर महानगरपालिका क्षेत्र, ता.पनवेल, जि.रायगड प्रॉपर्टी नं.१३६, क्षेत्र २११४ चौ.मीटर**

गैरअर्जदार क्र.२.१, २.२, २.३ व १.३ यांचा पत्ता आढळ होत नाही. उर्वरित गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली आहे. परंतु हे हजर नाहीत अगर त्यांचे म्हणणे प्राप्त झाले नाही. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेकामी अंतिम संधी देण्यात येत आाहे. तसेच वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दि.२/११/२०२२ रोजी सकाळी १२.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांचे काहीही म्हणणे असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.
ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०९/२०२२

सही/-
**(डॉ.सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत तीचे विद्यमान मालक / कब्जेदार श्री.रमेश लक्ष्मण म्हात्रे रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मौजे | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चिरनेर | २० | ५ | ००.२५.००<br>पो.ख. ००.०१.८०<br>एकूण ००.२६.८० | ५.३१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतः हून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
दि.२९/०९/२०२२
ठिकाण : उरण

सही/-
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**अे-६३, रुम नं.१०, सेक्टर-१, जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी नोड, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९०८२९११९१३**



**जाहीर नोटीस**
**उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**
On admission
आरटीएस अपिल क्र..../२०२२

१) श्रीमती.अनुबाई नामदेव पाटील
रा.नागझरी, पनवेल, जि.रायगड — वादी
विरुद्ध
१) श्री.धर्मा महादू पाटील
रा.नागझरी, पनवेल, जि.रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : नागझरी, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.२४७ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१३/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पपनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नागझरी, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| २६ | १०/अ/१ | ०.२९.३० | ४.६९ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०९/२०२२

सही/-
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**



Gunnal Judge
Adv.Asmita Bhuwad

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (JD) PANVEL
MA No.1344/2022
Exh No.7/D
Next Date : 19/11/2022

Public at large hereby inform that,
1) KIRAN RAJESH LADWAL
Age : 53
Resides-flat no.1, shivranjani Bldg.,
Plot No.16 A, Sector-21,
Kharghar, Panvel Raigad
2) Mr.Sunny Rajesh Ladwal
Age : 35
Resides-flat no.1, shivranjani Bldg.,
Plot No.16 A, Sector-21,
Kharghar, Panvel Raigad
3) Mr.Himanshi Rajesh Ladwal
Age : 34
Resides-flat no.1, shivranjani Bldg.,
Plot No.16 A, Sector-21,
Kharghar, Panvel Raigad — Applicant
V/S
1) Smt.Murtidevi Sajjansingh Ladwal
Age : 72
D-701, Kaatyayni Residency, off Mahakali Caves Road, Nera Maruti School, Andheri (East) Mumbai, Chakala, MIDC, Andheri (East) Mumbai 400093 — Respondent

Where as applicant above named has filed application before this honble court for grant of Heirship certificate in respect of the deceased late shri Rajesh Sajjansingh Ladwal who expired on 16/04/2021 at Pune, Maharashtra.

The applicant No.1 is the wife and applicant No.2 and 3 is sons of late shri Rajesh Sajjansingh Ladwal who expired on 16/04/2021 at Pune leaving behind the applicants as legal heirs. And Respondent smt.Murtidevi Sajjansigh Ladwal is mother of deceased late shri Rajesh Sajjansingh Ladwal.

The applicants says that late shri Rajesh Sajjansingh Ladwal who expired on 16/04/2021 at Pune and left no any other legal heirs except the applicants and mother of late shri Rajesh Sajjansingh Ladwal smt.Murtidevi Sajjansingh Ladwal (Respondent)

And whereas if any person has any objection in respect of heirs of late shri Rajesh Sajjansingh Ladwal., Hereby invite / submit his or her objection in this court, within 30 days from the date of publication of this notice

As such if nothing is received within the period of 30 days from the date of publication of this notice. Application of applicant shall be allowed and the Heirship Certificate as prayed for shall be granted.

Given Under May Hand and Seal of The Court On This Day of 23/09/2022

Sd/- Jr.Clerk Civil Court Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superident. Civil Court Panvel

